माहितीचा
अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**
**तक्रार क्रमांक : २०२/२०२२**

**तक्रारकर्ता, श्री. डॉ. अरुण यशवंतराव हुमणे,**
**विंग-बी-१, हनी अर्चना कॉम्प्लेक्स, उंटखाना, नागपूर-४४०००९**

**--विरुध्द--**

**जन माहिती अधिकारी तथा प्राध्यापक,**
**जनऔषध वैद्यकशास्त्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,**
**रामनगर, चंद्रपूर ता.जि. चंद्रपूर**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग ★नागपूर★ सत्यमेव जयते

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिष्ठाता,**
**शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, रामनगर, चंद्रपूर जि. चंद्रपूर**

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : ०२.०८.२०२२**

**तक्रारकर्ता** : उपस्थित
**जन माहिती अधिकारी** : उपस्थित
**प्रथम अपीलीय अधिकारी** : उपस्थित

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्जाचा दिनांक |
|---|---|---|
| २८.०६.२०२२ | -- | २२.०७.२०२२ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार अपील क्र. १६००/२०२२, दिनांक २८.०६.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता श्री. डॉ. अरुण हुमणे उपस्थित आहे. जन माहिती अधिकारी तथा प्राध्यापक, जनऔषध वैद्यकशास्त्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रामनगर, चंद्रपूर ता.जि. चंद्रपूर श्री. डॉ. मोहन खामगावकर उपस्थित आहे. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिष्ठाता, शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, रामनगर, चंद्रपूर जि. चंद्रपूर श्री. डॉ. अशोक नितनवरे उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या (द्वितीय अपील क्र. १६००/२०२२) मध्ये दिनांक २८.०६.२०२२ रोजी सुनावणी घेवून " प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, रामनगर, चंद्रपूर जि. चंद्रपूर यांनी प्रशासकीय स्तरावर वरील आदेश प्राप्त होताच ४ आठवड्याच्या आत अपिलार्थीस नुकसान भरपाई प्राप्त होईल याबाबतची कार्यवाही करावी व त्याचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. तसेच जोडपत्र-अ च्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती पुढील २४ तासाच्या आत सांक्षाकित व छायांकित करून अपिलार्थीस विनामुल्य प्रदान करावी व त्याची पोहच आयोगास सादर करावी." असे आदेशीत करून प्रस्तुत व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात आले.

सदर द्वितीय अपीलावरील आदेशास अनुसरुन तक्रारकर्ता यांनी दिनांक २२.०७.२०२२ रोजी कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावरील आज रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणी दरम्यान असे निदर्शनास आले की, प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता, शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, रामनगर, चंद्रपूर जि. चंद्रपूर यांनी दि. ०५.०७.२०२२ रोजी अपिलार्थी यांना संपूर्ण माहिती टपालाने व ई-मेलव्दारे प्रदान करण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी जोडपत्र-अ नुसार मागितलेली माहिती दि २०.०७.२०२२ रोजी प्राप्त झाली आहे. परंतु सदर माहिती सांक्षाकित करून दिली नाही असे, अपिलार्थी यांनी आयोगासमक्ष कथन केले. त्यानुषंगाने अपिलार्थी यांना पुनश्च: जोडपत्र-अ प्रमाणे संपूर्ण माहिती सांक्षाकित करून सदर आदेश प्राप्त होताच तात्काळ प्रदान करण्यात यावी व त्यांची पोहच आयोगास सादर करावी, या आदेशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर ★नागपूर★ सत्यमेव जयते

(राहुल भा.पांडे)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण-** नागपूर
**दिनांक-** ०२.०८.२०२२

जावक क्र.--902--------दिनांक--07 FEB 2023------------

S/A-2022/202-2022/ हुमणे